नियमीत दिवाणी मुकदमा क्र.६२/२०२० मधील नि. १७ वरील आदेश

{केशव बांदीवडेकर –वादी वि. दिपीका पांचाळ वगैरे –प्रतिवादी }

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी सदरचा अर्ज त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत दाखल करुन घेण्यात यावी यासाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना समन्स बजावणी झाल्यानंतर कोवीड–१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे त्यांना आवश्यक ती कागदपत्रे वेळीच उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे त्यांना वेळेत मे. कोर्टात हजर राहून त्यांची कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही. कैफियत दाखल करुन न करण्यामागे त्यांचा न्यायालयाचा अवमान करण्याचा हेतु नव्हता. त्यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांना न्यायालयामध्ये आपली बाजु मांडता येणार नाही व त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजुर करुन दाव्याचे कामी त्यांना बचाव मांडण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी केली आहे.

२. वादीने प्रस्तुतच्या अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. तसेच वादीस खर्च देण्याचे अटीवर अर्ज मंजुर करणेस हरकत नाही कथन केले आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी नं. १ ते ५ यांना दाव्याचे समन्स (नि.०६) पाठविण्यात आले आहे. ते दिनांक १०/०२/२०२१ रोजी आपले वकीलांमार्फत हजर झाले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०८, नियम १ अन्वये प्रतिवादी नं. १ ते ५ यांना उचित संधी देवून देखील त्यांनी विहित मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीनंतर दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुचा दावा, ठराव व कायम ताकीद आदेशासाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादी नं. १ ते ५ यांना दाव्यामध्ये

आपली कैफियत दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल. प्रतिवादी नं. १ ते ५ यांना कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयाला मदतच होणार आहे. प्रस्तुत प्रतिवादी नं. १ ते ५ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्याने वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही या निष्कर्षापर्यंत मी आले आहे. परंतु प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केल्यामुळे त्यांचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी नं. १ ते ५ यांनी वादीला रक्कम रुपये १००/- (रुपये शंभर मात्र ) इतका खर्च देणेचे अटीवर प्रतिवादींचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

सही/-

(अ. जो.बाचुळकर)

ठिकाण : कुडाळ. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दि. ०६/०४/२०२२ कुडाळ.